**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११ ००१**

**फोन नं.०२०- २६१२ २०७६**

फॅक्स नं. ०२०-२६१२ ७०४१ Email: ddtp.ho@maharashtra.gov.in


-: **कार्यालयीन आदेश** :-

**विषय** : **उपसंचालक, नगर रचना (गट-अ /राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या / प्रतिनियुक्तीबाबत.**

**संदर्भ** :- नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. नियुक्ती-१११९/३६२/प्र.क्र. ३८/नवि-२७, दि.०८.०३.२०१९.

**प्रस्तावना** :-

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये या संचालनालयाच्या आस्थापनेवरील उपसंचालक, नगर रचना संवर्गातील अधिकाऱ्यांच्या, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व कलम ४ (५) मधील तरतूदींनुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील परिशिष्ट-तीन, नियम ४० (१)(२)(३)(४) व परिशिष्ट-दोन मधील अटी व शर्तीनुसार प्रशासकीय कारणास्तव / विनंतीनुसार खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आल्यानुसार उपसंचालक, नगर रचना (गट-अ/ राजपत्रित) या तांत्रिक संवर्गातील अधिकाऱ्यांची बदली / प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात आलेली असुन, त्याबाबत कार्यकारी आदेश निर्गमित करण्याविषयी या संचालनालयास आदेशित केले आहे. त्यास अनुसरुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे उपसंचालक, नगर रचना (गट-अ/ राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदली / प्रतिनियुक्तीबाबत खालीलप्रमाणे कार्यकारी आदेश निर्गमित करीत आहेत :-

-: **आदेश** :-

| अ. क्र. | नाव | कोठून | कोठे | सध्याच्या पदाचा कार्यभार कोणाकडे सोपवावा | कार्यभार कोणाकडून स्वीकारावा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | श्री.प्र.रा.ठाकूर | उपसंचालक, नगर रचना, पिंपरी- चिंचवड महानगरपालिका (शासकीय आस्थापना) | उपसंचालक, नगर रचना, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई (प्रतिनियुक्ती) | श्री.म.य.देवडे, उपसंचालक, नगर रचना, पिंपरी- चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी यांचेकडे स्वतःच्या पदाचा व उपसंचालक, नगर रचना, पिंपरी- | श्री.भ.हि.कुंडले, सहायक नगर रचनाकार, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई |

| अ. क्र. | नाव | कोठून | कोठे | सध्याच्या पदाचा कार्यभार कोणाकडे सोपवावा | कार्यभार कोणाकडून स्वीकारावा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | चिंचवड मनपा व पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण घटक (वि.यो.)या पदाचा कार्यभार द्यावा. | |

०२. श्री.प्र.रा.ठाकूर, उपसंचालक, नगर रचना यांना सध्याच्या कार्यालयातून **दि.११.०३.२०१९ रोजी (मध्यान्हपूर्व)** कार्यमुक्त करावे व त्यांनी बदली झालेल्या कार्यालयात **लगोलग** रुजू व्हावे.

०३. श्री.प्र.रा.ठाकूर यांची सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने बदली / प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत असल्याने, त्यांना नियमानुसार अनुज्ञेय असणारा पदग्रहण अवधी त्यांचे अर्जित रजा खाती जमा करण्यात यावा. तसेच, त्यांनी अपेक्षिल्यास त्यांना बदली प्रवास भत्ता व वेतन अग्रिम मंजूर करण्यात यावे.

०४. संदर्भाधिन शासन निर्णयांन्वये, श्री.प्र.रा.ठाकूर, उपसंचालक, नगर रचना यांना प्रतिनियुक्तीबाबत खालील अटी व शर्ती लागू राहतील.

i. शासनाचे पत्र क्र. आढावा-६११६/ प्र.क्र.३३५/नवि-२७, दि.२४.११.२०१६ अन्वये प्राप्त झालेल्या, मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, नवि-१ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या, दि.२१.११.२०१६ चे बैठकीच्या इतिवृत्तानुसार, प्रतिनियुक्तीवरील बदली / पदस्थापना किमान ३ वर्षाकरीता देण्याबाबतचा तसेच सदर अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीवरील सेवा केव्हाही संपुष्टात आणण्याबाबतचा निर्णय शासन / संचालक घेऊ शकतील, अशा आशयाच्या झालेल्या निर्णयास अनुसरुन, श्री.प्र.रा.ठाकूर, उपसंचालक, नगर रचना यांची प्रथम ३ वर्षांकरिता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

ii. श्री.प्र.रा.ठाकूर, उपसंचालक, नगर रचना यांची महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहणी अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील परिशिष्ट-तीन, नियम ४०(१) (२) (३) (४) व परिशिष्ट-२ मधील अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे.(**परिशिष्ट-दोन** सोबत जोडले आहे). तसेच त्यांना राज्य शासनाचे तसेच संबंधित प्राधिकारणांचे सेवा विनियम लागू राहतील.

iii. श्री.प्र.रा.ठाकूर, उपसंचालक, नगर रचना यांची सेवा, लोकसेवेच्या हिताच्यादृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन / संवर्ग नियंत्रक अधिकारी / सक्षम प्राधिकारी राखून ठेवील. त्यावेळी श्री.प्र.रा.ठाकूर, उपसंचालक, नगर रचना, यांना

सेवेतून कार्यमुक्त करण्याची कार्यवाही संबंधित प्राधिकरणाने करावी.

iv. श्री.प्र.रा.ठाकूर, उपसंचालक, नगर रचना यांची सेवा, जर स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्याला मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र, याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेत्तर नियुक्त्याने शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची लेखी पूर्व सूचना दिली पाहिजे.

v. श्री.प्र.रा.ठाकूर, उपसंचालक, नगर रचना यांनी, मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे, अशी कमीत-कमी तीन महिन्यांची लेखी पूर्व सूचना, शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर, त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

०५. वरीलप्रमाणे बदली झालेले अधिकारी पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा राजकीय दबाव आणून पदस्थापना बदलण्याचा अथवा रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास, त्याची संबंधिताच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल. तसेच, राजकीय दबावाची कृती ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ते गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

०६. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्वीकारु नयेत, असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांस, त्यांच्या मूळ पत्त्यावर नोंदणीकृत देय डाकेने परत करावेत.

०७. या आदेशान्वये बदलीने पदस्थापनेच्या ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यभार स्विकारताच, याबाबत संचालनालयास तात्काळ अवगत करण्यात यावे.

०८. प्रस्तुत आदेश या संचालनालयाचे www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.

**(मा.संचालक, नगर रचना यांचे मान्यतेने)**

[संजय सावजी]
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

जा.क्र.आस्था/उसंनर/बदली/प्रतिनियुक्ती/प्रशा-१/१३३४
मध्यवर्ती कार्यालये, पुणे -४११ ००१
दिनांक - ०८ मार्च, २०१९.

**प्रत माहितीस्तव** :

१. मा. मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, नवि-२७, मंत्रालय, मुंबई

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव** :

१. महालेखापाल, मुंबई-१ / नागपूर-२.
२. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

४. सहसंचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष, पुणे / मूल्यांकन, पुणे,
विभागीय कार्यालये, पुणे / कोकण /नाशिक/औरंगाबाद/ नागपूर/अमरावती.

५. सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा

६. जिल्हा कोषागार अधिकारी,--------------------.

७. कार्यासन अधिकारी, प्रशा- १अ / १ ब / लेखा /अर्थसंकल्प, मुख्य कार्यालय,पुणे.

८. श्री.म.य.देवडे, उपसंचालक, नगर रचना, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी

९. सर्व संबंधित अधिकारी (विहित मार्गाने)

१०.श्री.पालकर / श्रीमती हुपरे, उ.श्रे.ल.ले.

११.वैयक्तिक धारिका.